सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे •अंक २१३ • शुक्रवार दि.२२ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## कॉकरोच पार्टीची भ्रष्टाचाराविरोधात मोहीम; जनतेला पुरावे पाठवण्याचं आवाहन

मुंबई/प्रतिनिधी-सोशल मीडियावर झपाट्याने लोकप्रिय झालेल्या कॉकरोच जनता पार्टीने आता भ्रष्टाचाराविरोधात मोहीम सुरू केली आहे. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी जनतेला भ्रष्टाचारा संदर्भातील कागदपत्रं, फोटो, व्हिडीओ आणि संबंधित अधिकाऱ्यांची माहिती पाठवण्याचं आवाहन केलं आहे. अवघ्या काही दिवसांत इन्स्टाग्रामवर सीजेपीचे फॉलोअर्स १ कोटी ९० लाखांवर पोहोचल्याची चर्चा आहे. कोणतीही खोटी आश्वासनं नाहीत, फक्त तथ्य आणि जनहित, असा दावा करत पक्षाने भ्रष्ट चेहरे जनतेसमोर आणण्याची भूमिका घेतली आहे.


# पालक आयएएस तर मुलांना आरक्षण कशासाठी ?

## ओबीसी क्रीमी लेयरवर सुप्रीम कोर्टाचे महत्त्वाचे निरीक्षण

नवी दिल्ली: जर एखाद्या उमेदवाराचे आई-वडील दोघेही आयएएस अधिकारी असतील, तर त्या मुलाला आरक्षणाचा लाभ का मिळावा? असा सवाल सुप्रीम कोर्टाने उपस्थित केला. त्यामुळे देशभरात क्रीमी लेयर आणि आरक्षणाच्या निकषांवरील चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे.

ओबीसी आरक्षणातील क्रीमी लेयरच्या निकषांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत आरक्षणाच्या लाभांच्या मर्यादांवर थेट प्रश्न उपस्थित केला आहे. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने स्पष्ट शब्दांत नमूद केले की, आरक्षणाचा मूळ उद्देश खऱ्या अर्थाने सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. आरक्षणामुळे एखाद्या कुटुंबाची सामाजिक






प्रगती झाल्यानंतर त्या कुटुंबाने अखेरीस आरक्षण व्यवस्थेबाहेर यायला हवे, असेही न्यायालयाने सूचित केले.सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नागरत्ना यांनी विचारले की, जेव्हा एखाद्या कुटुंबातील आई-वडील देशातील सर्वोच्च प्रशासकीय सेवेत पोहोचले आहेत, तेव्हा त्यांच्या मुलांना आरक्षणाची आवश्यकता का असावी? न्यायालयाच्या या प्रश्नामुळे ओबीसी आरक्षणातील क्रीमी लेयरच्या विद्यमान निकषांवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.या प्रकरणात विधिज्ञ शशांक रत्नू यांनी न्यायालयासमोर युक्तिवाद करताना सांगितले की, क्रीमी लेयर निश्चित करताना केवळ उत्पन्न हा निकष नसून संबंधित व्यक्तीचा सामाजिक आणि प्रशासकीय दर्जाही महत्त्वाचा असतो. त्यांनी नमूद केले की, गट-अ सेवांमधील अधिकाऱ्यांचा समावेश याच कारणामुळे क्रीमी लेयरमध्ये केला जातो. काही प्रकरणांमध्ये गट-ब अधिकाऱ्यांनाही या निकषांतर्गत आरक्षणाच्या लाभांपासून वगळले जाते.रत्नू यांनी स्पष्ट केले की, कर्मचाऱ्यांचे वर्गीकरण फक्त वेतनाच्या आधारे होत नाही, तर त्यांच्या पदाचा सामाजिक प्रभाव पान ४ वर

# स्वतंत्र कुणबी-मराठा मंत्रालय स्थापन करा

## आ.प्रसाद लाड-मनोज जरांगेंची भेट;आमरण उपोषणावर जरांगे ठाम

जालना : मराठा आरक्षणाच्या मागण्यांसाठी ३० मे पासून आमरण उपोषणाचा इशारा देणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांची आज भाजपचे नेते आ.प्रसाद लाड यांनी भेट घेतली. या भेटी दरम्यान जरांगे यांनी पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेत स्वतंत्र कुणबी मराठा मंत्रालय स्थापन करावे, नोंदी असलेल्यांना जात प्रमाणपत्र वाटप करावे सरकारने दिलेल्या आश्वासनांची पुर्तता करावी अन्यथा ३० मेपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसणार असल्याची घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.

भाजप नेते प्रसाद लाड यांनी आज अंतरवाली येथे जाऊन मनोज जरांगे यांची आंतरवाली सराटी येथे जावून भेट घेतली. यावेळी मनोज जरांगे यांनी सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त करत, ५८ लाख नोंदींचे काय झाले? नोंदी सापडल्यानंतरही कुणबी



प्रमाणपत्रे का दिली जात नाहीत? असा सवाल उपस्थित केला. मुंबई आंदोलनावेळी सरकारने दिलेली आश्वासने आठ महिने उलटूनही पूर्ण झाली नसल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाची दिशाभूल केल्याचा आरोपही त्यांनी केला.मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी स्थापन करण्यात आलेली पान ४ वर

# राज्यसभेच्या २४ जागांसाठी निवडणूक जाहीर

## राज्यातील पोटनिवडणुकीकडे सर्वांचे लक्ष

नवी दिल्ली:केंद्रीय निवडणूक आयोगाने देशातील राज्यसभेच्या देशभरातील १२ राज्यांतून राज्यसभेवर निवडून द्यावयाच्या २४ जागांसाठी निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये १० राज्यांतील २४ जागांसाठी नियमित निवडणूक तर महाराष्ट्रासह दोन राज्यांमध्ये पोटनिवडणूक होणार आहे. महाराष्ट्रातील रिक्त जागेसाठी कोणाला उमेदवारी मिळणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यसभेत जून आणि जुलै २०२६ मध्ये कार्यकाळ संपणाऱ्या राज्यसभा सदस्यांच्या जागांसाठी ही निवडणूक घेतली जाणार आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा तसेच मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचा कार्यकाळ संपत असल्याने या निवडणुकांकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे एक जागा रिक्त झाली आहे. या जागेसाठी पोटनिवडणूक होणार असून निवडून येणाऱ्या सदस्याचा कार्यकाळ ४ जुलै २०२८ पर्यंत राहणार आहे. त्यामुळे महायुती आणि विरोधकांकडून कोणाला उमेदवारी दिली जाणार, याबाबत राजकीय हालचालींना वेग आला आहे. आगामी निवडणुकांमध्ये सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय रस्सीखेच रंगण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्रातील पोटनिवडणुकीत कोणाचा राज्यसभेत प्रवेश होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून पुढील काही दिवसांत उमेदवारीबाबतचे चित्र स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## वाघाच्या हल्ल्यात चार महिला ठार


चंद्रपूर:सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही-पवनपार मार्गावरील खैरीचक जंगल परिसरात तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेलेल्या महिलांवर वाघाने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात चार महिलांचा जागीच मृत्यू झाला असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुंजेवाही गावातील १३ महिला तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी जंगलात गेल्या होत्या. त्यावेळी दबा धरून बसलेल्या वाघाने अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात कविता दादाजी मोहुर्ले (४५), अनिता दादाजी मोहुर्ले (४६), पान ४ वर

# मार्कंण्डेश्वर नदी घाटावर पोलीसांची धाड;४९ लाखांचा ऐवज जप्त

नांदेड/प्रतिनिधी-मार्कंण्डेश्वर ता.नांदेड शिवारातील नदी घाटावर गुरुवारी मध्यरात्री नांदेड ग्रामीण पोलीसांनी धाड टाकुन ४९ लाख रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

मार्कंण्डेश्वर शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून रेतीचा अवैध उपसा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर, फौजदार व्यंकट कुसमे व पोलीस



कर्मचाऱ्यांनी गुरुवारी मध्यरात्री रेती घाटावर छापा टाकला. नदी पात्रातून रेती इंजीन व तराफ्याच्या माध्यमातून उपसा सुरु होता. पोलीसांना बघून रेती तस्कर व मजूर नदीत उड्या मारुन पळून गेले. घटनास्थळावरुन पाण्यावर तरंगणारे चाळीस तराफे, रेती उपसा करणारे नऊ इंजीन, ४५ ब्रास रेतीचा साठा असा ४९ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. पोलीस शिपाई मारोती पंचलिंग यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गुरांची तस्करी करणाऱ्यांवर आता मोकाचा बडगा

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील गुरांची अवैध तस्करी, अनधिकृत कत्तलखाने आणि बेकायदेशीर कत्तलीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी राज्य सरकारने मोठा आणि कठोर निर्णय घेतला आहे. गुरांची तस्करी करणाऱ्या संघटित टोळ्या, संस्था आणि वारंवार अशा गुन्ह्यांत सहभागी आढळणाऱ्या व्यक्तींवर आता महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अर्थात मोका अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे. राज्याच्या गृह विभागाने २१ मे रोजी जारी केलेल्या शासकीय ठरावाद्वारे पोलीस व प्रशासकीय यंत्रणांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. सरकारच्या या निर्णयानुसार, गुरांची अवैध तस्करी किँवा बेकायदेशीर कत्तलीमध्ये संघटित पद्धतीने आणि सवयीने सहभागी असलेल्या टोळ्यांची पोलीसांकडून सखोल चौकशी केली जाणार आहे. तपासात गुन्हेगारी स्वरूप स्पष्ट झाल्यास संबंधितांवर मोका अंतर्गत गुन्हे दाखल करून कठोर कारवाई केली जाणार आहे.या निर्णयामागे संविधानातील कलम ४८ चा आधार घेत सरकारने गायी, वासरे आणि दुधाळ व श्रम करणाऱ्या जनावरांच्या संरक्षणासाठी प्रभावी उपाययोजना करणे ही राज्याची जबाबदारी असल्याचे नमूद केले आहे.

# नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपतर्फे अमरनाथ राजूरकर यांची उमेदवारी जवळपास निश्चित ?

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून भाजपतर्फे नांदेड महानगराध्यक्ष तथा माजी आ. अमरनाथ राजूरकर यांची उमेदवारी जवळपास निश्चित झाली असून लवकरच त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब होणार आहे.

नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून अमरनाथ राजूरकर यांनी २०१० व २०१६ मध्ये विजय मिळविला आहे. माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ते ओळखले जातात. दोन वर्षांपूर्वी



अशोक चव्हाण यांच्या समवेत त्यांनी भाजपात प्रवेश केला होता. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका व जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत भाजपला यश मिळवून देण्यासाठी त्यांनी जोरदार प्रयत्न केले होते.स्थानिक स्वराज्य संस्थेत भाजपचे संख्याबळ जास्त असल्याने हा मतदारसंघ भाजपलाच सुटल्यात जमा आहे. या मतदारसंघावर महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने दावा केला आहे. त्यांच्याकडे असलेल्या संख्याबळानुसार राष्ट्रवादी काँग्रेसला विजय मिळविणे कठीण आहे. महायुतीच्या जागा वाटपात नांदेड मतदारसंघ हा भाजपकडेच राहणार असल्याचे समजते. भाजपकडून नांदेड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून प्रदेश उपाध्यक्ष संजय कौडगे व ॲड.चैतन्य देशमुख यांचे नाव चर्चेत आली आहेत. परंतु भाजप पक्षश्रेष्ठींकडून माजी आ.अमरनाथ राजूरकर यांच्याच उमेदवारीला पसंती मिळणार असल्याचे समजते. त्यामुळे निवडणुकीत विजयाची हॅट्रीक साधण्यासाठी अमरनाथ राजूरकरांनी निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांकडून अजुनही प्रभावी उमेदवार अद्याप पर्यंत समोर आला नाही. काँग्रेसकडून हदगावचे माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर तसेच सौ.आशाताई शिंदे यांच्या नावाची चर्चा सुरु आहे.

# राज्यात मान्सूनपूर्व पावसाचा इशारा



मुंबई/प्रतिनिधी-राज्यात मान्सूनपूर्व हालचालींना वेग आला असून पुढील काही दिवस विविध भागांत पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. सक्रिय झालेल्या मान्सून वाऱ्यांमुळे कोकण किनारपट्टी, पश्चिम महाराष्ट्र तसेच काही मध्य महाराष्ट्रातील भागांत मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. त्यामुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

मुंबईसह कोकण पट्ट्यात गेल्या दोन दिवसांपासून वातावरणात बदल जाणवत असून अनेक भागांत ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. किनारपट्टी भागांत ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून विजांच्या कडकडाटासह पावसाचाही इशारा देण्यात आला आहे.रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे शेतकरी आणि नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. हवामानातील या बदलामुळे तापमानात काहीशी घट होण्याची शक्यता असून उष्णतेची तीव्रता कमी होईल, असेही सांगण्यात आले आहे.दरम्यान, विदर्भातील काही जिल्ह्यांत मात्र उष्णतेची लाट कायम असून नागपूर, चंद्रपूर आणि यवतमाळसह अनेक भागांत तापमानाचा पारा उच्चांक गाठत आहे. एका बाजूला कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे वातावरण तर दुसरीकडे विदर्भात तीव्र उकाडा, असे विरोधाभासी चित्र राज्यात पाहायला मिळत आहे.हवामान तज्ज्ञांच्या मते, अरबी समुद्रातील वातावरणीय बदल आणि सक्रिय होत असलेल्या मान्सून वाऱ्यांमुळे राज्यात मान्सूनपूर्व पावसाच्या हालचाली वाढल्या आहेत. पुढील काही दिवस ढगाळ वातावरण कायम राहण्याची शक्यता असून आगामी मान्सूनच्या आगमनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी महापालिकेकडून शोध व बचाव कार्याचे मॉक ड्रिल

नांदेड/प्रतिनिधी-आगामी पावसाळा आणि मान्सूनच्या पार्श्वभूमीवर शहरात संभाव्य पूर आणि आपत्कालीन परिस्थितीचा यशस्वीपणे सामना करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग पूर्णपणे सज्ज झाला आहे.पालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या आदेशानुसार आज (गुरुवार) सकाळी अग्निशमन दलाच्या वतीने गोदावरी नदी पात्रातील विष्णपुरी काळेश्वर डॅम याठिकाणी शोध व बचाव कार्याचे प्रात्यक्षिक म्हणजेच 'मॉक ड्रिल' यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आले.

पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे पूर येणे, सखल भागात पाणी साचणे किंवा नागरिक पुरात अडकणे अशा आपत्कालीन घटना घडण्याची शक्यता असते. अशा वेळी कमीत कमी वेळेत नागरिकांचे प्राण वाचवणे आणि मदत कार्य पोहोचवणे या उद्देशाने हे मॉक ड्रिल आयोजित करण्यात आले होते. यावेळी आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना पुरातून सुरक्षित बाहेर काढण्याचे थेट प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. शोध मोहिमेसाठी स्पीड बोट, लाईफ जॅकेट्स, लाईफ रिंग, अत्याधुनिक दोरखंड आणि शोध दिव्यांचा वापर करण्यात आला. याप्रसंगी प्रामुख्याने अग्निशमन विभागाकडे असलेल्या फुगवता येण्याजोग्या रबर बोटचे प्रात्यक्षिक आणि बाहेरची नौका मशीन पाण्यात वापरुन तपासणी करण्यात आली. या मॉक ड्रिल प्रसंगी महानगरपालिकेचे उपायुक्त नितीन गाढवे, अग्निशमन अधिकारी के.एस.दासरे, उपअग्निशमन अधिकारी निलेश कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली रेस्क्यु प्रात्यक्षिक पार पडले. या सरावात अग्निशमन विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. महानगरपालिका प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, पावसाळ्याच्या दिवसात कोणत्याही आपत्कालीन



परिस्थितीची माहिती अग्निशमन विभागाच्या मुख्य नियंत्रण कक्षाला तात्काळ द्यावी. महापालिकेचे आपत्ती व्यवस्थापन कक्ष चोवीस तास कार्यरत राहणार असून नागरिक, अग्निशमन दल आणि पोलीस प्रशासन यांच्यात समन्वय राखला जात आहे

# एक झुरळ आणि हादरलेली व्यवस्था!

**देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्यासारख्या उच्च पदावरील व्यक्तींच्या वक्तव्यांकडे देश गंभीरपणे पाहतो. कारण अशा व्यक्ती केवळ न्याय देत नाहीत, तर त्यांच्या शब्दांतून व्यवस्थेची मानसिकता देखील प्रकट होत असते. अशा परिस्थितीत ''तरुण बेरोजगार, पत्रकार हे न्यायव्यवस्थेला वाळवी लावणाऱ्या झुरळांसारखे आहेत'' अशा आशयाचे वक्तव्य समोर येणे आणि त्यानंतर त्यावर खुलासा करावा लागणे, ही घटना साधी नाही. या घटनेने देशातील अस्वस्थ तरुणाईच्या मनात साचलेला संताप पुन्हा एकदा उफाळून आला आहे. खरं तर हा वाद केवळ एका शब्दाचा नाही. प्रश्न आहे तो व्यवस्थेच्या नजरेत आजच्या तरुणाचे स्थान काय आहे, याचा. देशातील लाखो तरुण उच्चशिक्षित असूनही बेरोजगारीच्या गर्तेत अडकले आहेत. स्पर्धा परीक्षा, भरती प्रक्रिया, पेपरफुटी, कंत्राटीकरण आणि अस्थिर रोजगार यामुळे तरुणांमध्ये आधीच प्रचंड नैराश्य आहे. त्यात जर त्यांना ''झुरळ'' म्हणून पाहिले जात असल्याची भावना निर्माण झाली, तर त्याचा परिणाम समाजमनावर होणारच. याच पार्श्वभूमीवर अमेरिकेतील बोस्टन येथे शिक्षण घेणाऱ्या हिंगोलीच्या एका तरुणाने ''झुरळ जनता पार्टी'' किंवा ''कॉकरोच जनता पार्टी'' नावाने सुरू केलेली सोशल मीडियावरील चळवळ हा केवळ विनोद किंवा ट्रोलिंगचा प्रकार नाही. ती आजच्या डिजिटल पिढीच्या असंतोषाची नवी अभिव्यक्ती आहे. अवघ्या काही तासांत कोट्यवधी फॉलोअर्स मिळणे ही गोष्ट दाखवते की, देशातील तरुण मनोमन अस्वस्थ आहे आणि त्याला व्यवस्थेविरोधात बोलण्यासाठी एखाद्या प्रतीकाची गरज होती. भारतीय राजकारणात सोशल मीडियाची ताकद नवीन नाही. २०१४ पूर्वी महागाई, भ्रष्टाचार, राष्ट्रकुल घोटाळा, २ जी ३ जी प्रकरणे यांना सोशल मीडियातून मोठी हवा मिळाली. भारतीय जनता पक्षाने त्याचा अत्यंत प्रभावी वापर करत ''काँग्रेसमुक्त भारत'',''प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख'', ''दरवर्षी दोन कोटी रोजगार'' यांसारख्या घोषणांद्वारे जनतेमध्ये प्रचंड आशा निर्माण केली. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने सोशल मीडियाच्या बळावर जनमताचे राजकारणच बदलून टाकले. पण सत्तेत आल्यानंतर अनेक घोषणा ''चुनावी जुमला'' ठरल्याची टीका विरोधकांनी केली आणि त्याच सोशल मीडियावरून आता सत्ताधाऱ्यांवर प्रश्न विचारले जाऊ लागले. आज परिस्थिती अशी आहे की, ज्या माध्यमाचा वापर करून सत्ता मिळवली गेली, त्याच माध्यमातून आता असंतोष उभा राहत आहे. ''कॉकरोच जनता पार्टी'' ही त्याचीच झलक आहे. सत्ताधाऱ्यांना ही चळवळ धोकादायक वाटू लागल्याने ती देशविरोधी षडयंत्र असल्याचे आरोप सुरू झाले आहेत. सोशल मीडिया अकाउंट्स ब्लॉक करणे, हॅकिंगचे प्रयत्न, कार्यकर्त्यांवर दबाव अशा चर्चाही रंगू लागल्या आहेत. ही परिस्थिती लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. लोकशाहीमध्ये विरोध, उपहास आणि व्यंग ही शत्रूची नव्हे तर लोकशक्तीची चिन्हे असतात. एखाद्या तरुणाने सोशल मीडियावर आंदोलन उभे केले म्हणून त्याच्याकडे संशयाने पाहणे, त्याच्या कुटुंबावर दबाव येईल अशी भीती निर्माण होणे, हे निरोगी लोकशाहीचे लक्षण म्हणता येणार नाही. उलट त्यामुळे तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वास अधिकच कमी होतो.नाना पाटेकर यांच्या ''क्रांतिवीर'' चित्रपटातील संवाद अनेकांना आठवत आहे ''आ गए मेरी मौत का तमाशा देखने?'' आजच्या तरुणाईच्या मनातही तसाच प्रश्न आहे. रोजगार, शिक्षण, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि न्याय या मूलभूत प्रश्नांवर उत्तर न देता जर केवळ आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, तर ''झुरळ'' म्हणून हिणवले गेलेले हेच तरुण उद्या व्यवस्थेला कठोर प्रश्न विचारतील. शेवटी, कोणतीही सत्ता कायमस्वरूपी नसते; पण जनतेच्या मनात निर्माण झालेली नाराजी मात्र दीर्घकाळ टिकते. त्यामुळे शब्दांची जबाबदारी, सत्तेची संवेदनशीलता आणि तरुणांच्या प्रश्नांची प्रामाणिक दखल, हीच आजच्या लोकशाहीची खरी गरज आहे.**

# नीटचा पेपर रद्द; विद्यार्थ्यांचा दोष काय?

नीटचा पेपर फुटला. तो एवढ्या प्रमाणात फुटला की सरकारला नीटची झालेली परिक्षाच कँन्सल करावी लागली. हे सगळं बरोबर असलं तरी पेपर फुटीचं राजकारण न समजलेलं कोडं आहे. ज्या विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास केला आणि पेपर चांगला सोडवला. त्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचं व चांगला पेपर सोडविण्याचं काय? शिवाय हाच पेपर नव्याने पुढे घेतल्यानंतर आज ज्या विद्यार्थ्यांचा पेपर चांगला गेला होता. त्याचा पुढील पेपर चांगला न गेल्यास त्यांच्या भवितव्याचं काय? हाही प्रश्न जनसामान्य लोकांना पडलेला असून तो भेडसावत आहे.

बारावीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्यांच्या मेडीकल प्रवेशासाठी सक्षम ठरविणारी नीटची परिक्षा. ज्यातून ती रद्द करण्यात आली व नीटच नाही तर संपुर्ण परिक्षा यंत्रणेवर प्रश्नचिन्हं उभं राहिलं. तसं पाहिल्यास ह्या परिक्षा ज्या आताच्या काळात घेतल्या जातात. त्या परिक्षेचे पेपर फुटतातच कसे? हाही आणखी एक प्रश्न उभा राहतो.पेपरफुटीची समस्या ही आजची नाही. ही दहा वर्षापासून सुरु आहे. सन २०१६ मध्ये रिव्यू ऑफिसर पदाच्या परिक्षेचा लखनौमध्ये पेपर फुटला. सन २०१७ मध्ये बारावीचा बूक किंपिंग आणि अकाउंटन्सीचा पेपर फुटला. याचवर्षी स्टॉप सिलेक्शन कमिशनचा टेपर फुटला. सन २०१८ मध्ये पेपर फुटण्याच्या चर्चेवरुन दहावी, बारावीच्या गणित व अर्थशास्त्राच्या परिक्षा पुन्हा घेण्यात आल्या. याचवर्षी गुजरातमध्ये पोलीस भर्तीचा पेपर फुटला. सन २०१९ मध्ये रेल्वे भर्तीचा पेपर फुटला. सन २०२० मध्ये विधी विभागाचा पेपर फुटला. याचवर्षी उत्तर प्रदेशात बारावीचा पेपर फुटला. सन २०२१ मध्ये उत्तर प्रदेशात टिईटीचा पेपर फुटला. याचवर्षी नीटचाही पेपर फुटला. सन २०२२ मध्ये उत्तर प्रदेशात लेखपाल भर्तीचा पेपर




फुटला. याचवेळेस बिहारमध्ये लोकसेवा आयोगाचा पेपर फुटला. सन २०२४ मध्ये नीटचा पेपर फुटला. तसेच यावर्षी म्हणजेच २०२६ मध्ये बारावीचे काही पेपर फुटले आणि आता नीटचा पेपर फुटला.

पुर्वी असं नव्हतं. कोणतेच पेपर फुटत नव्हते. लोकँ इमानदार होते व ते पेपर फोडण्याच्या भानगडीत नसायचे. शिवाय त्या काळात न्यायालयही सक्षमतेने दोषींवर कडक कारवाई करायचं. परंतु आज तसं नाही. आज दहा निर्दोषांचं नुकसान झालं तरी चालेल. परंतु एका दोषी व्यक्तींवर कारवाई व्हायला नको. अशी अवस्था आहे. आज दोषींवर सरकारही जास्त कडक स्वरुपाची कारवाई करीत नाही आणि न्यायालयही नाही. दोषींना मिळते, अतिशय सौम्य स्वरुपाची शिक्षा. ज्यातून त्यांची हिंमत वाढते व पेपर फोडला जातो. फुटतो. ज्यातून अकार्यक्षम, सक्षम नसलेल्या विद्यार्थ्यांचा फायदा होतो. परंतु जे विद्यार्थी वर्षभर अगदी डोळे फोडून अभ्यास करतात. त्या विद्यार्थ्यांच्या भवितव्याचं काय? त्यांची क्रमवारी घसरत असल्यानं अशा विद्यार्थ्यांचा पुढील लायक असलेल्या शिक्षणासाठी वर्णी लागत नाही. ज्यातून त्यांचं भवितव्य अंधकारमय होतं.सध्याच्या काळात प्रत्येक वर्षी कोणते ना कोणते पेपर फुटतच आहेत. ज्यातून विद्यार्थ्यांचा मानसिक ताण वाढत आहे. एवढंच नाही तर ज्या केंद्रावर पेपर फुटतो. त्या केंद्रावरील इतर विद्यार्थ्यांचा दोष नसतांना त्या केंद्रावरील सर्वच विद्यार्थ्यांनी कॉपी केलेली असेल.अशी शंका घेवून इतर विद्यार्थ्यांनी सोडविलेले पेपर अधिक काटकसरीनं तपासले जातात. ज्यातून इतर होतकरु विद्यार्थ्यांचं नुकसानच केलं जातं. यात त्यांचा दोष नसतोच. तरीही असं घडतंच. आज विद्यार्थ्यांचा जो पेपर फुटतो. तो पेपर का फुटू शकतो? त्याचं कारण आहे, विद्यार्थ्यांबाबत राबवली जात असलेली परिक्षा यंत्रणा. जी यंत्रणा गोपनीय स्वरुपाची असायला हवी. परंतु राहात नाही. शिवाय दोषींवर कारवाई होते. परंतु तात्पुरत्या स्वरुपाची. ठोस कारवाई होतच नाही. ना न्यायालय त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी आदेश देत. ना शासन कडक पावलं उचलत. ज्यातून अशा घटना दरवर्षी होत आहेत. व्यतिरिक्त शासन त्यांच्यावर कडक कारवाई न करता परिक्षा पद्धतच रद्द करुन टाकतात. ज्यातून नुकसान आपलं थोडंच झालं. विद्यार्थ्यांचं झालं ना. होवू दे. आपलं काय जातं? अशा प्रकारची उदासिनता घेवून सर्रास झालेली परिक्षाच रद्द केली जात आहे. ज्यातून विद्यार्थ्यांचे भवितव्य खराब होत आहे. महत्वपुर्ण बाब ही लक्षात घेण्यासारखी आहे की शासनानं अशी परिक्षा रद्द करु नये. अशी परिक्षा रद्द न करता दोषींवर कडक कारवाई करावी. त्यातच शासनाला जमत नसेल तर न्यायालयानं तरी दोषींवर कडक कारवाई करावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांचं भवितव्य खराब होवू नये. राहिला प्रश्न पेपर फुटल्याचा. तर पेपर फोडून जेही विद्यार्थी पास होतात. ते सक्षम असतातच असे नाही. समजा ते सक्षम झालेही अभ्यासक्रमासाठी. तरी त्या विद्यार्थ्यात शैक्षणिक गुण नसल्यानं ते विद्यार्थी पुढील अभ्यासक्रम शिकतांना त्या अभ्यासक्रमातून कधीच पुढे जावू शकत नाही. कारण कावळ्याला कितीही साबन, पावडर वा पेंट लावून दिला. तरीही कावळा काळाच असेल. तो पांढरा बनणार नाही. तसंच परिक्षेचं आहे. कारण हिरा हा हिराच असतो. तो कोळशात जरी लपून बसला असला तरी. त्यामुळंच पेपर जरी फुटला असला तरी सरकारनं यापुढं परिक्षा रद्द करु नये. दोषींवर पाहिजे त्या प्रमाणात कडक कारवाई करावी. जेणेकरुन पुढील पेपर फोडतांना वारंवार विचार करावा लागेल.

अंकुश शिंगाडे
नागपूर.

# जनगणनेचे काम सर्वप्रथम पूर्ण करणारे मलिक चव्हाण यांचा जनगणना पथकाकडून गौरव

किनवट/प्रतिनिधी-केंद्र सरकारच्या डिजिटल जनगणना अभियानांतर्गत किनवट शहरात जनगणनेचे कार्य वेगाने सुरू असून नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा जनगणना चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. शहरात सध्या एकूण ०६ पर्यवेक्षक आणि ४३ प्रगणक कार्यरत असून, अत्यंत कडक उन्हातही कर्मचारी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत.

मे महिन्यातील तब्बल ४४ ते ४५ अंश सेल्सिअस तापमानातही जनगणना कर्मचाऱ्यांनी कामाची गती कायम ठेवली आहे. या पार्श्वभूमीवर किनवट शहरातील सर्कल क्र.०१, एचसीएल.-०६ अंतर्गत कार्यरत प्रगणक अब्दुल मलिक अब्दुल शब्बीर चव्हाण यांनी उल्लेखनीय कामगिरी करत किनवट तालुक्यात सर्वप्रथम जनगणनेचे कार्य पूर्ण करण्याचा मान मिळविला आहे. प्रगणक मलिक चव्हाण यांनी चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे तसेच सर्कल पर्यवेक्षक मल्लिका अर्जुन स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीत १३२ इमारतींमधील १५८ घरांची डिजिटल जनगणना पूर्ण केली. कमी वेळेत अचूक व शिस्तबद्ध पद्धतीने काम पूर्ण केल्यामुळे त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे व पर्यवेक्षक स्वामी यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाला याबाबत माहिती दिली. तसेच २१ मे रोजी केंद्र सरकार जनगणना कार्यालयचे पथक किनवट दौऱ्यावर आले असता डिजिटल जनगणनाचे जॉईंट डायरेक्टर शर्मा, असिस्टंट डायरेक्टर बी.प्रसाद व पांडे, डिस्ट्रिक्ट कॉओरडीनेटर नेहाल, लतीफ पठाण यांच्या हस्ते अब्दुल मलिक शब्बीर चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला. डिजिटल पद्धतीने जनगणना कार्य यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी किनवट शहरातील प्रगणक आणि पर्यवेक्षक अहोरात्र मेहनत घेत असून,



नागरिकांनीही जनगणना कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मलिक शब्बीर चव्हाण यांच्या कार्यामुळे इतर प्रगणकांनाही प्रेरणा मिळत असल्याची भावना दिल्ली पथकातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## जाहीर प्रगटन

श्री.के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक.३८/२०२६
रुक्मीनबाई व इतर वि.निरंक
प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १.रुक्मीनबाई परसराम तोटेवाड, वय ७० वर्षे, व्यवसाय-घरकाम, २.चंद्रभागाबाई बाबु तोटेवाड, वय ५२ वर्षे, व्यवसाय-घरकाम, ३. योगेश बाबुराव तोटेवाड, वय ३८ वर्षे, व्यवसाय-मजुरी, ४. गणेश बाबुराव तोटेवाड, वय ३४ वर्षे, व्यवसाय-मजुरी, ५. महेश बाबुराव तोटेवाड, वय ३० वर्षे, व्यवसाय-मजुरी सर्व रा.रापतवारनगर उमरी ता.उमरी जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत बाबुराव परसराम तोटेवाड,यांचे दिनांक १०/०३/२०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी रापतवारनगर उमरी ता.उमरी जि.नांदेड येथे निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १. रुक्मीनबाई परसराम तोटेवाड, वय ७० वर्षे, व्यवसाय-घरकाम रा. रापतवारनगर, उमरी ता.उमरी जि.नांदेड व इतर ४ हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत बाबुराव परसराम तोटेवाड, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री.बी.जी.सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक २२/०६/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक ०८/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **वरिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

श्री.के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक.३४/२०२६
भिमराव व इतर वि.निरंक
प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १. भिमराव गणपती सरोदे,वय ३६ वर्षे, व्यवसाय-मजुरी रा.निमटेक ता.उमरी जि.नांदेड, २.सावित्राबाई भिमराव गायकवाड, वय ४६ वर्षे,व्यवसाय-घरकाम रा.यळवत मं.मुधोळ जि.अदिलाबाद, ३. प्रयागबाई मारोती वाघमारे,वय ५० वर्षे,व्यवसाय-घरकाम रा.कामठी ता.जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत आनंदा गणपती सरोदे, यांचे दिनांक २५/०१/२०२३ रोजी राहत्या घरी मौ.निमटेक ता.उमरी जि.नांदेड येथे निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १.भिमराव गणपती सरोदे, वय ३६ वर्षे, व्यवसाय-मजुरी रा.निमटेक ता.उमरी जि.नांदेड व इतर २ हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत आनंदा गणपती सरोदे, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री.बी.जी.सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक २२/०६/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक /०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **वरिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

श्री.के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक.३५/२०२६
विठाबाई व इतर वि.निरंक
प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १. विठाबाई दिगांबर शिंदे,वय ६५ वर्षे, व्यवसाय -घरकाम, २.किर्ती गोविंद शिंदे,वय ४० वर्षे,व्यवसाय-घरकाम, ३.किरण गोविंद शिंदे,वय १९ वर्षे,व्यवसाय-शिक्षण, ४.कोमल गोविंद शिंदे, वय १७ वर्षे, व्यवसाय-शिक्षण अ.पा.क.आई किर्ती गोविंद शिंदे, वय ४० वर्षे,व्यवसाय-घरकाम सर्व रा.चिंचाळा ता.जि.नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत गोविंद दिगांबर शिंदे, यांचे दिनांक ०४/०१/२०२६ रोजी राहत्या घरी मौ.चिंचाळा ता.उमरी जि.नांदेड येथे निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १.विठाबाई दिगांबर शिंदे, वय ६५ वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.चिंचाळा ता.उमरी जि.नांदेड व इतर ३ हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत गोविंद दिगांबर शिंदे, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री.बी.जी.सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक २२/०६/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक /०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **वरिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

## जाहीर प्रगटन

श्री.के.एस.कुलकर्णी, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उमरी
यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक.३७/२०२६
मालनबाई व इतर वि.निरंक
प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज.

अर्जदार : १.मालनबाई जिवळा जाधव, वय ८० वर्षे, व्यवसाय-घरकाम, २.शिवाजी जिवलाजी जाधव, वय ५५ वर्षे, व्यवसाय-शेती, ३. कालाबाई मोतीराम राठोड, वय ७१ वर्षे, व्यवसाय-घरकाम, तिघे रा.निजामाबाद ता.जि.निजामाबाद, ४. चंद्रावती बाबू शाम, वय ६४ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.मेटुगुड्डा सिकिंद्राबाद, ५. पुष्पाबाई गोविंद राठोड, वय ६३ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.बोळसा बु.ता.उमरी जि.नांदेड, ६. सुशिला मारोती राठोड, वय ५१ वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.पासमला केव्ही रंगारेड्डी तेलंगाणा, ७. ज्योती वसंत राठोड, वय ५० वर्षे, व्यवसाय-घरकाम रा.संमपल्ली तांडा मं. डिचपल्ली जि.निजामाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मयत जिवला रुपला जाधव,यांचे दिनांक ०४/०३/२०२६ रोजी राहत्या घरी मौ.उमरी ता.उमरी जि.नांदेड येथे निधन झाले.

सदरिल जाहिर प्रगटनाद्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वर दर्शविण्यात आल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार १. मालनबाई जिवळा जाधव, वय ८० वर्षे, व्यवसाय-घरकाम, रा.निजामाबाद ता.जि.निजामाबाद. व इतर ६ हे मयताचे वारस असुन त्यांचे व्यतीरिक्त ईतर कोणीही वारस नसल्यामुळे त्यांना मयत जिवला रुपला जाधव, यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करण्यासाठी या न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबतचा अर्ज त्यांचे वकील श्री.बी.जी.सवई, यांचे मार्फत दाखल केला आहे. सदरिल प्रमाणपत्र हे सरकारी योजनेसाठी व इतर उदेशासाठी पाहिजे.

हे की, प्रस्तुत प्रकरणात वरिल बाबत कोणास काही आक्षेप, तक्रार अथवा उजर असल्यास त्यांनी त्या बाबतचे आपले म्हणने सदरिल जाहिर प्रगटन प्रकाशीत झाल्यापासुन दिनांक २२/०६/२०२६ पर्यंत विहीत मुदतीच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावे अन्यथा या बाबत कोणास कसल्याही प्रकारचा आक्षेप, तक्रार अथवा उजर नाही असे गृहीत धरुन नियमाप्रमाणे प्रस्तुतचे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक ०८/०५/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशावरुन

स्वाक्षरित/- **वरिष्ठ लिपीक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

स्वाक्षरित/- **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, उमरी जि.नांदेड

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# सुभाषनगरच्या तहानेवर जीवंत विहिरीचाच आधार;पुनर्जीवनाची नागरिकांची जोरदार मागणी

किनवट/प्रतिनिधी-किनवट नगरपरिषदेच्या सुभाषनगर प्रभागात पाणी टंचाईच्या दूर्भिक्षावर कायम स्वरुपी मात करण्यासाठी सार्वजनिक विहिरीतील गाळ काढणे काळाची गरज आहे.१३ जानेवारी २०१६ च्या सर्वसाधारण सभेत विषय सूची क्र.११० अन्वये विहीर पुनर्जिवीत करण्याचा ठराव पारित झाला. परंतु अंमलबजावणीचे घोडे कुठे पेंड खात बसले थांग पत्ता लागला नाही. सत्तास्थानी असलेल्या शिवसेना महाविकास आघाडीच्या नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांनी तरी तहानलेल्या सुभाषनगरवाशियांसाठी विशेष बाब म्हणून टंचाईच्या हेडखाली विहीर पुनर्जिवीत करून जीवदान देण्याची मागणी करण्यात आली आहे.

किनवट नगरपरिषदेच्या कार्यकक्षेतील सुभाषनगर येथील निजाम कालिन जीवंत भरपूर पाणी असलेली विहिर उपलब्ध आहे. एकेकाळी त्या विहिरीत मृतडुक्कर आढळल्याने तेव्हा पासून सदरहू विहिरीच्या पाण्याच्या वापराकडे नागरिकांनी पाठ फिरवली आणि घनकचरा साठवणूक केंद्र केले. विंधन विहिरींना पाणी असावे त्या प्रमाणात नसल्याने आज मितीस पाण्यासाठी त्राहीमाम निर्माण झालाय. प्रशासन प्रमुख रस्त्यांवर बोअरींग टाकायलेत पण पुरक पाण्याअभावी अनेक बोअरवेल धूळखात पडून असल्याचे





नागरिकांचे म्हणणे आहे. भरपूर पाणी असलेल्या विहिरीचे डंपींग ग्राऊंड करून प्रशासनाने लोकांनाच पाण्यासाठी वेठीस धरण्याचा प्रयत्न केल्याचे लोकांचे म्हणणे आहे.कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक स्वर्गिय कॉं.अब्दूल चाचा यांनी या विहिरीला पुनर्जिवीत करण्यासाठी पाठपुरावा केल्यानंतर नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत संमत झाला खरा अंमलबजावणी केलेली नसल्याने लोकांनी डंपींग ग्राऊंड केल्याचे सांगण्यात आले. त्या विहिरीतील गाळ आणि कचरा साफ करुन देण्याचे सर्वानुमते शिक्कामोर्तब करण्यात आला होता. नगराध्यक्षा सौ.सुजाता एंड्रलवार यांच्याकडून नागरिकांनी विहीर पुनर्जिवीत करून कायमस्वरूपी पाणी प्रश्न मिटविण्याच्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. पाण्यासाठी त्राहीमाम निर्माण झालेल्या परिस्थितीत विशेष बाब म्हणून टंचाईच्या हेडखाली काम करुन देण्याची मागणी केली आहे.

# जिल्ह्यात पेट्रोल,डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध : जिल्हाधिकारी

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील काही पेट्रेल पंपांवर पेट्रेल संपल्याबाबतच्या अफवा सोशल मीडियावर पसरत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये विनाकारण भीती व गोंधळ निर्माण होऊन पेट्रेल पंपांवर मोठ्या प्रमाणावर गर्दी होत आहे. मात्र नांदेड शहर तसेच जिल्ह्यात पेट्रेल व डिझेलचा पुरेसा साठा आणि नियमितपणे पुरवठा होत आहे.

अचानकपणे डिझेलच्या मागणीत २५-३० टक्के वाढ झाल्याने, पॅनीक खरेदी होत असल्याने टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे, असा स्पष्ट खुलासा जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी केला आहे. जिल्हा प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, इंधन पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत सुरू असून संबंधित यंत्रणेमार्फत यावर सातत्याने देखरेख ठेवली जात आहे. गुरूवार २१ मे २०२६ रोजीच्या उपलब्ध आकडेवारीनुसार जिल्ह्यात एकूण १ हजार ९५१ केएल पेट्रेल आणि २ हजार ७९ केएल डिझेलचा साठा उपलब्ध आहे. नागरिकांनी शांतता, संयम व सहकार्य राखावे. सर्वांच्या सहकार्याने कोणतीही अनुचित परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. जिल्ह्यात निर्माण झालेल्या इंधन समस्येविषयी आढावा बैठकीत त्यांनी नागरिकांना आवाहन केले. याप्रसंगी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हा कृषी अधिक्षक, तेल कंपनीचे विक्री अधिकारी उपस्थित होते. तसेच सर्व क्षेत्रीय अधिकारी व्हिसीद्वारे उपस्थित होते.

